RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

संपर्क मो. 8482839451

शनिवार, १३ डिसेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २६४ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 13 December 2025 | Year : 5 | Issue : 264 | Daily | Rate: Rs. 5/-

## नागपूर हिवाळी अधिवेशन








### विधान भवनातील क्षणचित्रे, निषेध, भेटीगाठी

## विरोधी पक्षनेतेपदाबाबत उद्धव ठाकरे आक्रमक

**नागपूर :** विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात प्रथमच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेतेपद नसताना त्याच मुद्द्यावरून राजकारण तापले आहे. पाशवी बहुमताच्या भरवशावर सरकार मुजोर झाले आहे. कायद्यात नसतानाही दोन उपमुख्यमंत्री आहेत, मग दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेते का नाहीत असा सवाल विरोधकांनी केला. यानंतर आता ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांची भेट घेऊन दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेत्याची नियुक्ती करण्यासंदर्भात निवेदन दिले. पत्रकार परिषदेत बोलतांना उद्धव ठाकरे म्हणाले की, सध्या सुरू असलेले अधिवेशन संपण्यापूर्वी दोन्ही सभागृहांना विरोधी पक्षनेता मिळावा, अशी आमची अपेक्षा आहे. आम्ही जनतेचे प्रश्न मांडत आहोत. ते आमचे कर्तव्य आहे. परंतु, विरोधी पक्षनेत्याला एक दर्जा असतो. त्याला एक मान असतो, तो प्रशासनाशी, अधिकाऱ्यांशी अधिकाकाराने बोलू शकतो, प्रश्न विचारू शकतो. मिळालेल्या माहितीच्या आधारे सरकारला जाब विचारू शकतो. मात्र, हे सरकार विरोधी पक्षनेता नको या विचारांचे दिसत आहे, या शब्दांत उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सभागृहात विरोधी पक्षनेता असायला हवा. ते पद आहे, मात्र त्या पदावर माणूस नेमलेला नाही. त्यामुळे लवकरात लवकर विरोधी पक्षनेता नेमावा. माझे या सरकारला आणि दोन्ही सभागृहांच्या प्रमुखांना एकच सांगणे आहे की नियमांची आडकाठी पुढे कराल तर मग मी उपमुख्यमंत्रिपदाचा विषय काढेन, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

# राज्यातील 12 जिल्हे उत्तर प्रदेश, बिहारपेक्षाही मागास !

## अधिवेशनाचे सत्ताधाऱ्यांना गांभीर्य नाही, 'हम करे सो कायदा'... : हर्षवर्धन सपकाळ

नागपूर : नागपूरचे हिवाळी अधिवेशन अवघे एक आठवड्याचे घेऊन भाजपा महायुती सरकारने विदर्भ कराराचा अनादरच केला आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार, कायदा सुव्यवस्था, भ्रष्टाचार महिला सुरक्षा यासारखे असंख्य प्रश्न असताना अधिवेशनात त्यावर चर्चा होत नाही आणि कुठे कुत्री पकडा, बिबटे सोडा यावर चर्चा होत आहे. सत्ताधारी पक्षाला अधिवेशनाचे काही गांभीर्य राहिलेले नाही, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. प्रसार माध्यमांशी बोलतांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दररोज भ्रष्टाचाराची एक एक प्रकरणे उघड होत आहेत. पैशांचा सुळसुळाट सुरु आहे. भ्रष्टाचार हेच सरकारचे ब्रिद वाक्य आहे. **'न खाऊंगा, न खाने दुंगा'**, पासून झालेली सुरुवात आता **'मिल बाट के खायेंगे'** पर्यंत आली आहे. राज्यातील भ्रष्टाचारावर श्वेतपत्रिका काढून त्यावर चर्चा झाली पाहिजे पण सत्ताधारी पक्षच सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू देत नाहीत. गंभीर विषय सुरु असताना सत्ताधारी पक्षाचे सदस्य विनोद करत असतात. लोकशाहीचा कटेलोट होताना दिसत आहे. सत्ताधारी पक्षातीलच काही सदस्य भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत, सरकारने आतातरी डोळे उघडावे, या शब्दांत हर्षवर्धन सपकाळ यांनी निशाणा साधला.






## विधीमंडळ प्रवेशाच्या पासेसची दीड हजारांत विक्री

**नागपूर :** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी विधानपरिषदेतील शिवसेना सदस्य हेमंत पाटील यांनी खळबळजनक आरोप केला आहे. विधीमंडळात परिसरात प्रवेशासाठीच्या अभ्यागतांच्या पासेसची दीड हजारांत विक्री होत असल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे विधीमंडळ वर्तुळात खळबळ उडाली आहे.
विधानपरिषदेत बोलतांना त्यांनी याबाबत माहिती दिली. आमचे काही कार्यकर्ते दिवसभर बाहेर उभे होते. मात्र आमचे पत्र असूनदेखील त्यांना पासेस मिळाल्या नाहीत. परंतु बाहेर दीड हजारांत प्रवेशासाठी पासेस विकण्यात येत आहेत. अशा पद्धतीने तर विधीमंडळाची सुरक्षाच धोक्यात आली असून ही लाजीरवाणी बाब आहे. अशा पद्धतीने तर कधीही दहशतवादी आत शिरू शकतात. अशा पद्धतीने कुणी पासेस जारी केले व त्या बदल्यात पैसे घेतले याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी पाटील यांनी केली. यावर अमोल मिटकरी यांनीदेखील आक्रमक पवित्रा घेतला. यंदा परिसरात गर्दी टाळण्यासाठी मर्यादित पासेस वाटण्यात येणार असल्याचे अधिवशनाच्या दुसऱ्या दिवशी स्पष्ट करण्यात आले होते. मात्र सद्यस्थितीत परिसरात इतकी गर्दी आहे की नीट चालणेदेखील कठीण झाले आहे. इतके सारे लोक आत कसे काय येत आहेत व इतक्या प्रमाणात पासेस का जारी करण्यात येत आहेत, असा सवाल मिटकरी यांनी उपस्थित केला. यावर तालिका सभापती कृपाल तुमाने यांनी सखोल चौकशी करण्यात यावी, असे निर्देश दिले.

## सर्वांगीण विकासाचे दावे फोल; गरीब, अतिगरीब जिल्ह्यांकडे दुर्लक्ष

**नागपूर :** महाराष्ट्राची प्रगती केवळ नऊ जिल्ह्यांमध्ये दिसते. उरलेले 27 जिल्ह्यांची अवस्था 'विकासाची पंगत बसली अन् बुंदी संपली' अशी आहे. यापैकी अतिगरीब 12 जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न देशाच्या सरासरीपेक्षा कमी आहे. दुसरीकडे, 30 वर्षे राज्याच्या विकासाचे जिल्हानिहाय मोजमाप झालेले नाही. विधिमंडळाच्या पावित्र्य आणि परंपरा लक्षात घेऊन भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या या मुद्द्यावर गंभीरपणे चर्चा होणार का, हा सवाल आहे. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचे रोज नवनवे दावे केले जात असले तरी जिल्ह्यांची नेमकी प्रगती किती झाली, हे तपासण्याचे दरडोई उत्पन्न हेच त्यातल्या त्यात विश्वासार्ह असे साधन आहे. कारण, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र ही वैधानिक विकास मंडळे स्थापन झाली तेव्हाच्या, 1994 मधील दिवंगत भुजंगराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील निर्देशांक व अनुशेष समितीनंतर गेल्या 30 वर्षांमध्ये जिल्ह्याजिल्ह्यांच्या विकासाचे मोजमाप झालेले नाही. तिन्ही विकास मंडळांतील वैधानिक शब्द निरवळून पडल्यालाही आता पाच वर्षे झाली आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे गोंदिया, जळगाव, नांदेड, जालना, बीड, परभणी, यवतमाळ, हिंगोली, गडचिरोली, बुलढाणा, वाशिम व नंदुरबार या बारा जिल्ह्यांमधील सरासरी दरडोई उत्पन्न, तर 1 लाख, 88 हजार 892 रुपये या देशाच्या सरासरीपेक्षा कमी आहे. याचा अर्थ हे जिल्हे उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, झारखंड, छत्तीसगड वगैरे गरीब राज्यांपेक्षा बिमारू आहेत. सध्या ही मंडळे कागदावरच आहेत.




## संविधान प्रचारक संघाचा संविधान मोर्चा

**नागपूर :** भारतीय संविधानाच्या 75 व्या वर्षानिमित्त भारतीय संविधानावर खऱ्या अर्थाने अंमल करण्याच्या दृष्टीने संविधान मार्च चे आयोजन करण्यात आले होते. हा मार्च इंदोरा चौक येथून एलआयसी चौकापर्यंत काढण्यात आला. मोर्चाचे प्रमुख वामन सोमकुवर, उत्तम शेवडे, एड अस्मिता तिडके, सुनंदा कोचे, छाया बेहरे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. निवेदनात बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सुट्टी कायमची घोषित करावी. अनिवार्य विषय म्हणून पाठ्यक्रमात आठव्या वर्गापासून भारतीय संविधान शिकविल्या जावे. देशभरातील सर्व प्रादेशिक भाषेत शासकीय माध्यमाद्वारे संविधानाचा प्रचार व प्रसार व्हावा. घर घर संविधानांतर्गत निशुल्क किंवा अत्यंत अल्पदरात संविधानाच्या लाखो प्रती उपलब्ध करून द्याव्या. अनुसूचित जाती जमातीच्या उत्थान्नासाठी आरक्षित असलेला निधी इतरत्र वळविल्या जाऊ नये. संविधानाच्या रक्षणार्थ असवैधानिक ईव्हीएम वर निवडणुका घेण्याऐवजी मतपत्रिकेवर घेतल्या जाव्या. एक देश, समान शिक्षण व मोफत शिक्षण हे धोरण लागू करावे. यासोबतच नारा येथील 130 एकर जागेवर डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क बनवण्यात यावा, अंबाझरी येथील 20 एकर जागेवर विना विलंब डॉ. आंबेडकर स्मारक उभारावे, यशवंत स्टेडियम शेजारच्या पटवर्धन मैदानावर डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी स्मारक बनवावे, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश करण्यात आला होता. मोर्चात प्रामुख्याने रजनी तायडे, अर्चना टेंभुर्णे, सोनाली ठवरे, योगिता शेंडे, शोभना टेंभुर्णे, अर्चना राळे, प्रिया गजभिये, पुष्पा घोळके, वर्षा आं टेंभेकर, नंदा भगत, सुरज रोडगे, सुनील गजभिये, गौतम पाटील, नरेश वासनिक, विजय सुरवाडे, देविदास राऊत, निरंजन पाटील, संदीप रामटेके, शामराव तिरपुडे आदि प्रमुख कार्यकर्त्या सहित मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## मानव हक्क संरक्षण मंचचा विधानसभेवर धडक मोर्चा

**नागपूर :** विध्यार्थ्यांच्या विविध ज्वलंत मागण्यांसाठी काल विधान सभेवर विशाल धडक मोर्चा विविध संघटनांच्या संयुक्त कृती समिती द्वारे आशिष फुलझेले यांच्या नेतृत्वात काढण्यात आला. यात प्रामुख्याने मानव अधिकार संरक्षण मंच, द प्लॅटफॉर्म, नेचर फॉउंडेशन, ब्लू क्लब व इतर काही संघटनाचा प्रमुख सहभाग होता.
अनुसूचित जाती -जमाती चा स्वतंत्र कायदा बनविणे, विध्यार्थ्यांची 2 वर्षापासून प्रलंबित शिष्यवृत्ती तात्काळ देणे, स्वाधार योजनेची 5 की मी. ची व ATKT ची मर्यादा रद्द करून सर्व पात्र विध्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देणे, वसतिगृहातील विध्यार्थ्यांना चांगले जेवण देण्यासाठी योग्य कंत्राटदार नेमणे, उच्च शिक्षित संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना 2023 पासून प्रलंबित फेलोशिप प्रदान करणे,परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विध्यार्थ्यांची संख्या व शिष्यवृतीत वाढ करणे व तसेच JEE/NEET परीक्षामध्ये अनियमितता करणाऱ्या बार्टी महासंचालक व संबंधित संस्थांवर कार्यवाही करणे अशा अनेक मागण्यांचे निवेदन या दरम्यान मा. मुख्यमंत्री यांना देण्यात आले. या प्रसंगी बी.एस.पी., ब्लू क्लब व इतर विध्यार्थी संघटनाच्या प्रतिनिधीन्नी मोर्च्याला संबोधित केले. महाराष्ट्र शासनाने याची योग्य दखल घेतली नाहीतर यापुढे तीव्र आंदोलन करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.




## महत्त्वाच्या बातम्या

### IAS अधिकारी तुकाराम मुंढे यांना क्लीन चीट !

**नागपूर :** वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्यावर कथित भ्रष्टाचार तसेच लक्षवेधी सूचना दाखल केल्यानंतर मुंडेंनी धमकी दिल्याचा आरोप नागपूर पूर्वचे आमदार कृष्णा खोपडे यांनी विधानसभेत केली होती. राज्यसेवेतील कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जाणारे आयएएस तुकाराम मुंढे यांना त्यांच्याविरोधात झालेल्या या आरोपांमधून अधिकृतरीत्या क्लीन चीट मिळाली आहे. तुकाराम मुंढे यांना मंत्र्यांची विधानसभेत क्लिन चीट मिळाली तसेच ईओडब्लु व पोलिसांच्या चौकशीतही त्यांना क्लिन चीट दिल्याचे नमूद केले. फक्त महिला आयोगाचा अंतिम चौकशी अहवाल येणे बाकी आहे. त्या अहवालावर पुढील कारवाई होईल. मुंढे नागपूर महानगरपालिका आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांच्यावर नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पातील नियुक्त्या व वादग्रस्त बदलीसंदर्भात अनेक आरोप करण्यात आले होते. मात्र, विधानसभेत मुंढे यांना आता क्लीन चीट दिली गेली आहे.

### 10 हजार द्या किंवा 1 लाख द्या, कुणीही मुस्लीम...! हिमंत बिस्वा सरमा

**आसाम :** आसाममध्ये असे अनेक समुदाय आहेत, राज्यात मतदानाचा कल सरकारी योजना अथवा आर्थिक प्रोत्साहनांवर नाही, तर विचारधारेने प्रभावित असतो, असे आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी म्हटले आहे. ते म्हणाले, 'आसाममधील काही समुदाय त्यांच्या कामाची प्रशंसा करतात, पण मतदानाच्या वेळी त्यांच्या बाजूने येत नाहीत. राज्यात मतदानाचा कल सरकारी योजना अथवा आर्थिक प्रोत्साहनाने नव्हे, तर विचारधारेने प्रभावित असतो. एवढेच नाही तर, कितीही पैसा द्या, मग 10 हजार रुपये द्या अथवा 1 लाख रुपये, कोणताही मुस्लीम मतदार आपल्याला त्यांचा उमेदवार म्हणून निवडणार नाही,' असेही सरमा यांनी म्हणाले.

## विमान तिकिटांच्या किमती वर्षभर नियंत्रित करता येत नाहीत : राममोहन नायडू

**नवी दिल्ली :** अलिकडेच, इंडिगो संकटादरम्यान, विमान भाड्यात मोठी वाढ झाली. त्यानंतर, सरकारने तिकिटांच्या किमतींवर मर्यादा घातली. आता, सरकारने विमान भाडे नियंत्रित करण्याबाबत एक मोठे विधान केले आहे. नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू यांनी शुक्रवारी संसदेत सांगितले की, विमान भाडे वर्षभर नियंत्रित करता येत नाही. केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू म्हणाले की, सरकारने देशव्यापी विमानभाड्यांवर मर्यादा लादणे व्यावहारिक ठरणार नाही. त्यांनी असा युक्तिवाद केला की अनियंत्रित बाजारपेठेचा शेवटी ग्राहकांना फायदा होतो. ते म्हणाले की, या क्षेत्राचा विकास होण्यासाठी नियंत्रणमुक्ती करण्यात आली आहे. ज्या सर्व देशांनी असाधारण वाढ पाहिली आहे त्यांनी त्यांच्या बाजारपेठा अनियंत्रित ठेवल्या आहेत. ते म्हणाले की यामुळे अधिक कंपन्यांना या क्षेत्रात प्रवेश करण्यास प्रोत्साहन मिळते आणि सहकार्यासाठी दरवाजे उघडतात. 'यामुळे बाजारपेठेतील गतिशीलता नैसर्गिकरित्या दिसून येते, मागणी आणि पुरवठा त्यांच्या नैसर्गिक भूमिका बजावू शकतो. शेवटी, प्रवासी सर्वात मोठे लाभार्थी आहेत,' असे नागरी विमान वाहतूक मंत्री म्हणाले.

## जनगणना 2027 साठी 11,718 कोटी रुपयांचे बजेट मंजूर



**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी तीन महत्त्वाचे निर्णय घेतले. यांत, जनगणना 2027, कोळसा उत्पादन आणि शेतकऱ्यांशी संबंधित निर्णयांचा समावेश आहे. यासंदर्भात, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, जनगणना 2027 साठी मंत्रिमंडळाने 11,718 कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहेत. ही भारतातील पहिलीच डिजिटल जनगणना असणार आहे. डिजिटल डेटा सुरक्षितता लक्षात घेऊन ही जनगणना दोन टप्प्यांत केली जाईल. पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर 2026 दरम्यान हाऊस लिस्टिंग आणि गृहनिर्माण गणनेचा असेल, तर दुसरा टप्पा फेब्रुवारी 2027 मध्ये लोकसंख्या गणनेचा असेल. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या मोबाइल अप्लिकेशनद्वारे माहिती संकलित केली जाईल.

# 130 एकर डॉ. आंबेडकर पार्कच्या जमिनीचे आरक्षण रद्द!

### जमीन मालकांच्या याचिका हाय कोर्टाने केल्या मंजूर

**मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी नारा येथील पार्कच्या 130 एकर जमिनीचे आरक्षण रद्द केले. न्यायमूर्तिद्वय अनिल पानसरे व राज वाकोडे यांनी हा निर्णय दिला.**

**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने बुधवारी नारा येथील पार्कच्या 130 एकर जमिनीचे आरक्षण रद्द केले. न्यायमूर्तिद्वय अनिल पानसरे व राज वाकोडे यांनी हा निर्णय दिला. या ठिकाणी राज्य सरकार व नागपूर सुधार प्रन्यास यांनी स्वखर्चामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क विकसित करावे, अशी मागणी केली जात होती. त्यामुळे ही जमीन अनेक वर्षापासून चर्चेचा विषय होती.
7 जानेवारी 2000 रोजी जाहीर केलेल्या नागपूर शहराच्या विकास आराखड्यामध्ये ही जमीन पार्ककरिता आरक्षित करण्यात आली होती. परंतु, नागपूर सुधार प्रन्यासला आर्थिक अडचणीमुळे ही जमीन संपादित करण्यात



अपयश आले. त्यामुळे गेल्या 25 वर्षांपासून परिस्थिती जैसे थे होती. परिणामी, जमीन मालक सुरेश सुरी, शशी सहानी व कमलेश चौधरी आणि गोल्डटच रियल इस्टेट कंपनी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायद्यातील कलम 127 अनुसार जमिनीचे आरक्षण रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या.
नासुप्रने बाजारभावानुसार जमीन - खरेदी करू शकत नाही, असे - न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने यासह विविध बाबी लक्षात घेता जमीन मालकांच्या याचिका मंजूर केल्या.

## हिवाळी अधिवेशनानंतर सत्तांतर होईल का? आ. शिवकुमार



**बेळगावी :** कर्नाटक विधानसभेच्या बेळगावमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान सत्ताबदलाची चर्चा जोर धरू लागली आहे. काँग्रेस आमदार इक्बाल हुसेन यांनी एक धाडसी दावा केला आहे की, अधिवेशन संपताच उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार हे राज्याचे पुढचे मुख्यमंत्री होतील. 50-55 काँग्रेस आमदारांनी उपस्थित असलेल्या डिनर बैठकीनंतर हुसेन यांनी हा दावा केला. गुरुवारी रात्री उशिरा झालेल्या या बैठकीनंतर राजकीय हालचालींना उधाण आले आहे. माध्यमांशी बोलतांना हुसेन म्हणाले, *'शिवकुमारजींना संधी मिळेल, ते मुख्यमंत्री होतील. त्यात काय चूक आहे? त्यांच्या संघर्षाचे आणि कष्टाचे फळ मिळेल असा आपल्या सर्वांना विश्वास आहे.'* त्यांनी पुढे सांगितले की, रात्रीचे जेवण हे शक्तीप्रदर्शन नव्हते, तर आमदारांचा एक साधा मेळावा होता. *'आपण सर्व मित्र आहोत. जेवण खाणे हे शक्तीप्रदर्शन नाही.'* काँग्रेस आमदाराने असेही स्पष्ट केले की पक्षाची शिस्त सर्वोपरि आहे आणि अंतिम निर्णय हायकमांड घेईल. ते म्हणाले, *'आम्ही संख्येच्या आधारे राजकारण खेळत नाही आहोत. हायकमांड जो काही निर्णय घेईल तो आम्ही सर्वजण पाळू.'* 20 नोव्हेंबर रोजी कर्नाटकातील काँग्रेस सरकारने आपला कार्यकाळ अर्ध्यावर पोहोचताच, सिद्धरामय्या मुख्यमंत्रीपद सोडू शकतात अशी अटकळ सुरू झाली. अलिकडेच, मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री शिवकुमार यांनी एकमेकांच्या घरी नाश्त्याच्या बैठका घेतल्या, ज्याला नेतृत्व वाद मिटवण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जात होते. 8 डिसेंबरपासून सुरू झालेले हिवाळी अधिवेशन 19 डिसेंबरपर्यंत चालेल हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या !




आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!
वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

“ साम्राज्य उभारण्यासाठी मनाने नाही तर बुद्धीने चालावे लागते... ”



# संविधानातून ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवाद’ शब्द गाळण्यासाठी विधेयक

भिम सिंग, भाजपचे राज्यसभा खासदार यांनी 5 डिसेंबर 2025 रोजी The Constitution (Amendment) Bill, 2025 हे खासगी सदस्य (Private Member's) विधेयक सादर केले, ज्यात भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेतून (Preamble) ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ हे शब्द वगळण्याची मागणी केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की हे शब्द 1976 मध्ये आणीबाणीच्या काळात म्हणजे 42 व्या घटनादुरुस्ती दरम्यान (42nd Amendment to the Constitution of India) जोडले गेले होते, तर मूळ संविधानात हे शब्द नव्हते. त्यांनी असेही सांगितले की राज्यघटनेची मूळ रचना स्वतःच धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक कल्याण सुनिश्चित करते त्यामुळे हे शब्द प्रस्तावनेत समाविष्ट असणे आवश्यक नाही, उलट त्यामुळे ‘गोंधळ’ निर्माण होतो. खाजगी सदस्यांनी मांडलेल्या विधेयकांपैकी फारच कमी पारित होतात. याचे कारण असे की संविधान दुरुस्तीला (उदा. प्रस्तावना बदलणे) व्यापक राजकीय एकमत आणि संसदेत मजबूत बहुमताची गरज असते आणि सुप्रीम कोर्टासारख्या सर्वोच्च न्यायालयाने आधीच निर्णय दिला आहे. की "Secular" आणि "Socialist" हे शब्द संविधानाच्या प्रस्तावनेत समाविष्ट करणे आणि ते संविधानाचा कायमस्वरूपी भाग मानणे वैध आहे; या दृष्टिकोनातून केवळ सदनात प्रस्ताव मांडणे पुरेसे नाही, तर व्यापक कायदेशीर आणि संवैधानिक चर्चा आणि कदाचित न्यायालयीन पुनरावलोकनही आवश्यक ठरेल. तरी सुद्धा वारंवार ‘सेक्युलर’ आणि ‘समाजवादी’ शब्द संविधानातून काढून टाकण्यासाठी का प्रयत्न केले जातात? ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी संघर्ष केला, त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले. परंतु धर्मावर आधारित देशाचे निर्माण करण्याचे प्रयत्न म्हणजे चातुवर्ण्यावर आणि जातीयव्यवस्थेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करणे ठरते. ते काही जातींचे श्रेष्ठत्व आणि काही जातींना गुलाम करणारी मनुस्मृतीवर आधारीत समाजरचना निर्माण करण्यास प्राधान्य देते. त्यामुळे ‘धर्मनिरपेक्षता’ हद्दपार करणे या देशावर आघात ठरू शकतो. आणीबाणी लागू झाल्याच्या 50 वर्षांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात, आरएसएसचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबाळे यांनी 26 जून 2025 ला सांगितले की, संविधानाच्या प्रस्तावनेतील ‘समाजवादी’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द कायम राहावेत की नाही यावर चर्चा झाली पाहिजे. त्यानंतर केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान सुद्धा म्हणाले, की सर्व धर्मांचा सन्मान हा भारतीय सभ्यतेचे मूल्य आहे, ‘धर्मनिरपेक्षता हे आपले सभ्यतागत मूल्य नाही. आपण अशी प्राचीन भूमी आहोत जिथे धर्मांचा आदर आणि सद्भाव अंतर्निहित आहे. म्हणूनच आणीबाणीच्या काळात संविधानाच्या प्रस्तावनेत जोडलेला ‘धर्मनिरपेक्ष’ हा शब्द काढून टाकला पाहिजे. आपण सर्वांच्या कल्याणावर आणि ‘विश्व एक कुटुंब आहे’ या तत्त्वावर विश्वास ठेवत आलो आहोत. त्यामुळे ‘समाजवादी’ या शब्दाचीही गरज नाही आणि तो काढून टाकण्याचा विचार करायला हवा.’ तसेच आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा म्हणाले होते की, ‘संविधानातून समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे शब्द हटवता येऊ शकतात’. ते म्हणतात, ‘मी धर्मनिरपेक्ष कसा असू शकतो? मी एक कट्टर हिंदू आहे. एक मुस्लीम व्यक्ती कट्टर मुस्लीम असतो. तो धर्मनिरपेक्ष कसा असू शकतो?’ त्यांचे हे वक्तव्य 28 जून 2025 चे आहे. त्यांचे म्हणने आहे की, ‘समाजवाद’ आणि ‘धर्मनिरपेक्षता’ या पाश्चिमात्य संकल्पना आहेत. अनंत हेगडे यांनी त्यांच्या विधानात सांगितले की प्रस्तावनेतून ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द काढण्यासाठी भाजप संविधानात सुधारणा करेल. त्यांनी लोकांना लोकसभेत भाजपाला दोन-तिहाई बहुमत देण्याचे आवाहन केले होते. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ हे शब्द जोडण्याविरोधात दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने नाकारली होती.



सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, आपातकालीन परिस्थितीत (1975-77) केलेले संविधानातील बदल अमान्य ठरू शकत नाहीत. 1976 मध्ये इंदिरा गांधींच्या सरकारने 42व्या संविधान बदलाच्या माध्यमातून प्रस्तावनेत हे शब्द जोडले होते. सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या बेंचने या याचिकेवर विस्ताराने सुनावणी करण्याची गरज नाही असे सांगितले. न्यायालयाने स्पष्ट केले की प्रस्तावना हा संविधानाचा अविभाज्य भाग आहे आणि संसदेला संविधानातील प्रस्तावना सुधारण्याचा अधिकार आहे. मुख्य न्यायमूर्ती खन्ना म्हणाले की भारतीय संदर्भात ‘समाजवादी’ शब्दाचा अर्थ म्हणजे वेलफेअर स्टेट, म्हणजे राज्य नागरिकांच्या कल्याणासाठी जबाबदार आहे. न्यायालय म्हणाले की, आणीबाणीच्या परिस्थितीत संसदने केलेले निर्णय अमान्य ठरवता येणार नाहीत. ‘धर्मनिरपेक्षता’ हा भारतीय संविधानाच्या बेसिक स्ट्रक्चरचा भाग आहे आणि हा नेहमीच त्याचा कोर फीचर राहिला आहे. समानतेच्या अधिकारासह वापरलेले ‘बंधुत्व’ हे शब्द धर्मनिरपेक्षतेचा संदेश देतात, त्यामुळे धर्मनिरपेक्षता संविधानाच्या मुख्य वैशिष्ट्यांपैकी एक आहे. याचिकाकर्त्यांचे दावे याचिकाकर्ता सुब्रमण्यम स्वामी, विष्णु शंकर जैन आणि इतरांनी संविधानाच्या प्रस्तावनेत ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ शब्दांचा समावेश हा नंतर केला त्याबद्दल विरोध केला. त्यांनी म्हटले की 1976 मध्ये हा बदल आणीबाणी दरम्यान केला गेला आणि याबाबत जनमत विचारले गेले नाही. सुब्रमण्यम स्वामी म्हणाले की, संविधानाच्या प्रस्तावनेत बदल करण्याचा अधिकार फक्त संविधानसभेकडे होता आणि या बदलासाठी राज्यांचा सल्ला घेतला गेला नाही. अश्विनी उपाध्याय म्हणाले, की ते शब्दांविरुद्ध नाही, आणि त्यांचा संविधानात समावेशही योग्य आहे, परंतु 1976 मध्ये प्रस्तावनेत हे शब्द कसे जोडले गेले याबाबत प्रश्न आहेत. यामुळे भविष्यातील सरकारांना अनावश्यक स्वतंत्रता मिळू शकते. याचिकाकर्त्यांनी तर्क दिला की प्रस्तावनेत नंतर बदल करून त्याला 1949 पासून लागू करणे चुकीचे आहे. प्रस्तावनेत बदल कधी झाला? 1949 मध्ये संविधान तयार झाल्यावर प्रस्तावना अशी होती. ‘संप्रभु, लोकतांत्रिक गणराज्य.’ 26 जानेवारी 1950 रोजी संविधान लागू झाले. 1976 मध्ये इंदिरा गांधींच्या सरकारने 42व्या संविधान बदलानुसार प्रस्तावना बदलली आणि ती अशी झाली. संप्रभु, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकतांत्रिक गणराज्य. या बदलानंतर प्रस्तावनेत ‘समाजवादी’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ शब्दांचा समावेश झाला. कोर्टात झालेली चर्चा सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांच्या दाव्यांचा विचार केला आणि न्यायालयाने ही टिप्पणी केली की, ‘धर्मनिरपेक्षता’ हा नेहमीच संविधानाच्या बेसिक स्ट्रक्चरचा भाग राहिला आहे आणि समानतेच्या अधिकाराशी जोडलेला ‘बंधुत्व’ याचा पुरावा आहे. भारताचे सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर 2024 मध्ये त्या याचिका फेटाळून लावल्या ज्यांमध्ये प्रस्तावनेतून ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ हे शब्द काढण्याची मागणी करण्यात आली होती. न्यायालयाने स्पष्ट केले की 1976 मधील दुरुस्ती वैध होती आणि त्या वेळी संसदेने केलेली कारवाई कायदेशीरदृष्ट्या योग्य होती. प्रस्तावनेत केलेला हा बदल संविधानाच्या कलम 368 अंतर्गत शक्य आहे. त्यामुळे हे शब्द आता संविधानाचा स्थिर आणि मान्य भाग बनले आहेत. केशवनंद भारती विरुद्ध केरळ राज्य (1973) सर्वात महत्त्वाचा निर्णय बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिन निश्चित झाली. कोर्ट म्हणाले संसद संविधानात बदल करू शकते. परंतु संविधानाची मूलभूत रचना बदलता येत नाही. या निर्णयाने पुढे ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ शब्दांच्या कायमस्वरूपी अस्तित्वाचा पाया रचला. मिनर्वा मिल्स विरुद्ध भारत संघ (1980) सुप्रीम कोर्टाने ठरवले 42 व्या सुधारणा काही भाग असंवैधानिक, परंतु ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ शब्द जोडणे वैध आहे. या निर्णयाने स्पष्ट केले की या शब्दांचा प्रस्तावनेत समाविष्ठ असणे संविधानाच्या मूलभूत रचनेविरुद्ध नाही. एस. आर. बोम्मई विरुद्ध भारत संघ (1994) सेक्युलरिझमशी संबंधित सर्वात महत्त्वाचा निर्णय "Secularism is part of the basic structure of the Constitution." (धर्मनिरपेक्षता ही संविधानाची मूलभूत रचना आहे) म्हणजेच प्रस्तावनेतून ‘सेक्युलर’ शब्द काढणे Basic Structure चे उल्लंघन होईल आणि असंवैधानिक ठरेल. अरुणा रॉय विरुद्ध भारत संघ (2002) कोर्टने पुन्हा स्पष्ट केले. ‘सेक्युलरिझम भारताच्या संविधानाचा मूलभूत तत्त्व आहे.’ ‘सेक्युलर शिक्षण’ वैध आहे. 2010-2020 दरम्यान अनेक लहान निर्णय झाले. ‘हिंदू राष्ट्र’ किंवा धार्मिक राज्याच्या कल्पनेशी संबंधित अनेक याचिका दायर झाल्या. सर्व ठिकाणी कोर्टाने पुनरावृत्ती केली. भारत एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे. ही संविधानाची मूलभूत रचना आहे. सुप्रीम कोर्ट - 2024 आदेश (अत्यंत महत्त्वाचा) 2024 मध्ये सुप्रीम कोर्टाने प्रस्तावनेतून ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ शब्द हटवण्यासंदर्भात सर्व याचिका फेटाळल्या. कोर्टने स्पष्ट केले. 42 वा सुधारणा वैध होती, हे शब्द हटविणे संविधानाच्या मूलभूत रचनेवर परिणाम करेल. म्हणजे संसद हे शब्द हटवू शकत नाही, कारण ते Basic Structure च्या विरोधात आहे. सुप्रीम कोर्टचा हा आदेश 2025 पर्यंतची स्थिती पूर्णपणे स्पष्ट करतो. ■ ■



पुरुषोत्तम संबोधी
मो.9422803760

# संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे ही काळाची गरज

नुकताच 26 नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिनानिमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले. मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये. वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील ‘आम्ही भारताचे लोक’ ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील 365 दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमावर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत. म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज 76 वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत. म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे. मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा, (क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे. मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे. म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात. पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो. तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य-अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते. त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच. पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे. ■ ■





श्याम ठाणेदार, पुणे
9922546295

# संत परंपरा आणि त्यांची विचारधारा



महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले आहे. भारतीय संत आणि त्यांचे कार्य बघता एकंदरीत सर्वच संतांचा एकच उद्देश होता, समाज जागृती करणे. समाज उद्धारा साठीचा संतांचा कळवळा मग ते तुकाराम महाराजापासून ते जगनाडे महाराज असो किंवा आपले गौतम बुद्ध. गौतम बुद्धा सारखे तर कॉन्सलर दुसरे कोणी असूच शकत नाही. संतांनी अवघड उपासना केली. पण आपल्याला सांगितले, अहो येता जाता, उठता बसता, देता घेता, समाजाचे हीत पाहा. आजच्या काळात सगळीकडे स्पर्धेचे युग आहे. पण संतांच्या विचारातून आपण पाहिले तर आधी आपण माणूस बनायला हवे. संतांची विचारधारा सध्याच्या परिस्थितीत अनुकरणास सोपी आणि सर्वांना सामावून घेणारी आहे. समाजभान कसे जपावे, कसे जगावे याचे संस्कार संतांच्या संप्रदायाच्या उपासना पद्धतीमध्येच आहेत. कारण त्यांच्या उपासना या एकटे बसून लोकांपासून दूर जाऊन केल्या जात नव्हत्या, तर ते सर्वांना एकत्र घेऊन सामुहिक पद्धतीने केल्या जात होत्या. उदाहरण द्यायचे झाल्यास, भजन, कीर्तन, पंढरपूरची पायी वारी आणि यातुनच समाज प्रबोधन होत असे. बुद्धाची शिकवण पद्धती सुद्धा अशीच होती. म्हणूनच म्हणतात, म्हणवूनी मेळ जमविला, असा बहुतांचा मेळ बनवून हे कार्य केले जायचे. संतांची ठाम धारणा होती की एकटे पुजा अर्चा केल्याने स्वतः पुरते बघता येते, पण सगळा समाज जर एकत्र आला आणि संतांच्या विचारधारेशी जुळत गेला तर एकमेकांच्या समस्येचा निचरा होऊन जात, धर्म, लिंग भेद, प्रांत, भाषा कसलाही भेद न माननारी संतांची विचारधारा होय. अशा सामुहिक उपासना पद्धतीने लोकांना एकमेकांबद्दल जिव्हाळा, आपुलकी, प्रेम, आदर वाटणे सहाजिकच आहे. हा सुद्धा संतांच्या विचारधारेचा अट्टाहास होता. म्हणूनच ‘हे विश्वची माझे घर’ असा संत मोलाचा संदेश देतात. संत संप्रदाय एकमेव संप्रदाय असा आहे की जिथे संत ही संकल्पना 100टक्के समाजाभिमुख आहे. तुकोबाराय म्हणतात, ‘जे का रंजले गांजले, त्याशी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा,’ ज्यांचे हृदय लोण्याच्या गोळ्यासारखे अंतर्बाह्य मुलायम असते तीच व्यक्ती घरातील दासींना सुद्धा पोटच्या मुलाप्रमाणे वागवतो. समाजातील निराधार लोकांना आधार देतो, समाज परिवर्तन घडवतो. मडके घडविता घडविता गोरा कुंभाराचा समाज परिवर्तनाचा मार्ग असो, किंवा तुकडोजी महाराजांचे खंजीरी भजनातून केलेली शिकवण, बुद्धाने केलेला बोध हे सर्व समाज परिवर्तनाच्या जडणघडणीत उपयोगी आहेत. यांचे संतत्व कुठल्याही बाजारात विकत मिळत नाही. रानावनात हिंडून मिळत नाही, तर ते लोकांमध्ये राहूनच लोक कल्याणासाठी केलेला संतांचा हा प्रयास होता आणि हाच संतांचा सिद्धांत आहे, तो संतांनी प्राप्त केला आहे. दान द्यायचे तर ते सुद्धा अगदी गरजू लोकांना. कुणीही उपाशी राहू नये आणि हे अन्न दान करताना जात, पात, धर्म, पंथ न पाहता गरजू लोकांच्या पोटातील भुक पाहावी. असा सल्ला संतांचाच असायचा. शूधेलिया अन्न द्यावे, पात्र न विचारून. तुकोबाराय म्हणतात, माझी उपासना, माझा उपदेश पक्षपाती नसून सर्व मानव जातीला कवेत घेणारा आहे. त्यामुळे त्यांची वैखरी ही विश्व व्यापक झालेली आहे. संत संप्रदाय मानव जातीला आचरण्यासाठी अतिशय सोपा असा संप्रदाय आहे. तो कुणाचे लागून चालन करणारा नसून प्रत्येक जीवाला सम भावनेने पाहणारा संप्रदाय आहे. भगवान गौतम बुद्धाने चित्त विमुक्त करणाऱ्या ध्यानपद्धती सांगीतलेल्या आहेत. समाजाप्रती करुणा, दुःख दूर करणे, हे मैत्रीचेच रूप आहे. सजीवांचे दुःख पाहून हृदयात कुंपन होणे, मन द्रवीत होणे ही लक्षणे संतांच्या ठायी दिसून येतात. अशा प्रकारे संत सज्जनांचा पुरस्कार करत दर्जनातील दुर्गुण बाजूला सारत सज्जन बनविणारा आणि एकमेकातील सौहार्द वाढविणारा हा संप्रदाय आहे. ‘कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पुजनाचे’ हीच मानवजातीच्या भल्यासाठी केलेली सर्वश्रेष्ठ पुजा आहे. संतांनी सांगितल्याप्रमाणे ‘एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ,’ हाच संतांचा विचार अखिल विश्वातील मानव जातीपर्यंत पोहचविण्यासाठी आपणही प्रतिज्ञा करूया. तुकाराम महाराजांची गाथा बुडविली म्हणतात, पण विचार नाही बुडवू शकले, समाजाला वैदिकांचे षडयंत्र, विषमता यातून बाहेर काढण्यासाठी, अभंगातून जनजागृतीचे काम केले, म्हणूनच म्हणावेसे वाटते. संतांचे संगती मनो मार्ग गती आकळावा श्रीपती येणे पंथे. ■ ■



मंदाकिनी काकडे,
मो. 8600017963

# शेवटी उरते राख

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जन्माची चाहुल ही नऊ महिने अगोदर लागते पण मृत्यूची वेळ मात्र नऊ सेकंदाआधीही कळत नाही. अचानकपणे शिंक यावी तसा तो येतो अन् कुडीतला प्राण घेऊन जातो. मृत्यू जेव्हा येतो तेव्हा तो कमावलेली संपत्तीच काय खिशातला रुमाल काढायचीही संधी देत नाही. म्हणूनच म्हणतात आयुष्य हे काल्पनिक आहे आणि त्याचा भक्कम पुरावा म्हणजे मृत्यू. प्रत्येकाचा एक्सपायरी डेट ठरलेली असते पण याची जाणीव फक्त नियतीला असते. झाडावरून गळणारे प्रत्येक पान हा संदेश देतो की, जेव्हा कुणी कुणावर ओझे होतो तेव्हा त्याला कधी ना कधी गळून पडावेच लागते या गोष्टींची कल्पना जरी सर्वांना असली तरी माणूस मात्र प्रत्यक्ष आयुष्यात काय करतो तर तो पद, प्रतिष्ठा, संपत्ती, मोह, मत्सर, अहंकार, राग, द्वेष, ईत्यादी कितीतरी गोष्टींना आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण महत्त्व देतो. या गोष्टींना कवटाळत बसल्याचा त्रास स्वतःला कितीही त्रास झाला तरी तो आपला अट्टाहास मात्र सोडायला तयार नसतो. पण जेव्हा त्याच्या मृत्यूनंतर त्याची चिता पेटवल्यावर देहाची राख शिल्लक राहते त्या राखेमध्ये कितीही शोध घेतला तरी आयुष्यभर तो ज्या गोष्टींना जपत राहीला त्याचा जराही अंश त्या राखेत कुठेही सापडत नाही.
मौत एक सच्चाई है, उसमें कोई ऐब नहीं,
क्या लेकर जाओगे यारों? कफ़न में कोई जेब नहीं. ■ ■

# पुरातत्व विभागाच्या ताब्यात असुनही अपरीचित-दुर्लक्षित राहिलेली महाडची कोल बौद्ध लेणी

महाड हे सह्याद्रीच्या पर्वतरांगाने घेरलेले आणि सावित्री व गांधारी नदीच्या काठावर वसलेले प्राचीन शहर आहे. कोकणातल्या शहरांमध्ये महाड हे सर्वाधिक प्रगतशील शहर असून हे मुंबईपासून 180 किमी अंतरावर आहे. आसपासच्या रम्य व सुंदर वातावरणामुळे महाड हे पर्यटनाचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. इस.पूर्व 130 मध्ये महाडवर बौद्ध धम्मीय कंभोजवंशिय राजा विष्णू पुलित यांचे राज्य होते. महाडची गांधारपाले बौद्ध लेणी यांच्या राजवटीत निर्माण केली होती, त्याचा शिलालेख तेथे आहे. महाडवर मुख्यत मौर्य सम्राट, कंभोज, सातवाहन, क्षात्रप, वाकाटक, शिलाहार, देवगिरीचे यादव, निजामशाह, आदिलशाह, शिवाजी महाराज, पोर्तुगीज, पेशवे, सिद्धी यांची राजवट झाली आहे. इस 1818 मध्ये ब्रिटिशांनी पेशव्यांकडून महाड जिंकले. 1947 ला स्वातंत्र्य मिळेपर्यंत महाड ब्रिटिशांच्या अंमलाखाली होते. 1866 ला इंग्रजानी महाड येथे नगरपालिका स्थापन केली. इसविसनाच्या पहिल्या शतकापासून महाड हे कोकणातील एक प्रमुख बंदर व व्यापार केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. देवगिरीच्या यादव राजवटीत महाराष्ट्राची सर्वात जास्त व्यापारी उन्नती झाली होती. महाड तालुक्यातील पाले गावापासून काही अंतरावर असलेल्या कोल गावच्या बौद्धवाडीच्या व चव्हाणवाडीच्या वरच्या डोंगरात 7 प्राचीन बौद्ध लेण्यांचा समुह आहे. हा लेणीसमुह पुरातत्व विभागाच्या अखत्यारित असला तरी आजही अपरीचित व सोयी सुविधांचा अभाव असल्याने पर्यटक येथे फिरकत नाहीत. बौद्ध भिक्षूंना धम्माचा प्रचार प्रसार करण्यासाठी व त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासाठी या लेण्यांची निर्मिती करण्यात आली होती. येथे 3 धम्मलिपीतील शिलालेख व 6 भिक्षू निवास आहेत. लेण्यांतील धम्मलिपीतील शिलालेखांच्या अक्षरवाटिकेवरुन या लेण्या सातवाहनकाळातील असाव्यात असे अभ्यासकांचे मत आहे. सम्राट अशोकांचे मांडलिक राजे म्हणून सातवाहनांची ओळख आहे. तथागत गौतम बुद्धांच्या काळातच महाराष्ट्रात खासकरुन संपूर्ण कोकणात (अपरांत) व गोव्यापर्यंत



(सुनअपरांत) बौद्ध धम्म पसरला होता. हा एक व्यापारी मार्ग असल्यामुळे व्यापाऱ्यांना विसावा घेण्यासाठी देखील या लेणीचा वापर केला जात होता.

लेणी क्र. 1 :- भिक्षू निवास असून ते सध्या मातीने पूर्ण भरलेले असून त्यावरील शिलालेख हा अस्पष्ट झालेला आहे. या लेणीचा वापर राहण्यासाठी/अध्ययनासाठी केला जात होता.

लेणी क्र. 2 :- हे एक विहार असून याची पडझड झालेली आहे. आतमध्ये आसन आहे जे भिक्षूंना ध्यान साधना करण्यासाठी कोरलेले आहे. सध्या लेणे हे भग्न अवस्थेत असून मातीने पूर्णपणे भरलेले आहे.

लेणी क्र. 3 :- येथे 2 खोल्या व व्हरांडा आहे. हे एक भिक्षू निवास आहे. प्रवेशद्वार चौकोनी असून येथील भिंतीवर धम्मलिपीतील शिलालेख आहे. शिलालेख व भाषांतर पुढीलप्रमाणे - ‘आघासकसा गामिकियस सिवदतस लेण देयधम’ म्हणजेच आघासकसा गावातील रहिवासी सिवदत याने दान दिलेले लेणे.

लेणी क्र. 4 :- या लेणीच्या व्हरांड्यामधील भिंतीवरील शिलालेख - ‘उपासकस दुहुतुय धंमसिरिय सिवदतस बितियकाय लेण देयधम’ म्हणजेच उपासकाची मुलगी, सिवदत याची पत्नी धम्मसिरी हिने लेण्याची दिलेली पुण्यकारक देणगी.

लेणी क्र. 5 :- विहार लेणी असून या ठिकाणी प्रार्थना स्थान असण्याची शक्यता आहे. येथे नाणी सापडलेली आहेत. या लेण्यांची कमान व आतील भागात एक छोटे विहार पाहायाला मिळते. लेणीच्या डाव्या बाजूला आत मध्ये एक खोली आहे व त्यावर एक शिलालेख कोरलेला आहे. ‘ठरत गहपती पुतस सेठीस संघरखित सदय धम लेण’ म्हणजेच ‘ठरत गृहपतीचा मुलगा श्रेष्टी संघरखित याने हे धम्मलेन दान’ दिल्याचा उल्लेख आहे. या उल्लेखानुसार हे मुख्य लेण असावे असे अभ्यासकांचे मत आहे. या लेण्यांचे बांधकाम इस पूर्व पहिल्या शतकात केलेले आहे. मातीने भरल्यामुळे दर्शनी भाग छोटा वाटतो. या लेण्यांवर कोणत्याही प्रकारची कलाकुसर नाही.

लेणी क्र. 6 व 7 च्या लेण्या दुसऱ्या समुहात मोडतात. उपलब्ध अवशेषांवरुन लेणी क्र. 6 च्या मागच्या बाजूस दोन खोल्या व उजव्या बाजूस एक खोली असलेले सभागृह असावे असे अभ्यासकांचे मत आहे. हा एक संघाराम आहे. परंतु पूर्णतः मातीखाली गाडला गेल्याने त्याच्या आजूबाजूच्या खुणा दिसत आहेत. याचे उत्खनन केल्यास तेथे एक मोठे विहार सापडू शकेल.

लेणी क्र. 7 हे विहार लेणे असून डाव्या भिंतीत 2 खोल्या व उजव्या भिंतीत अर्धवट खोदलेल्या 2 खोल्या आहेत. समोरचा भाग पडला असल्यामुळे हे लेणे नैसर्गिक गुहेसारखे भासते. खोल्यांचे दरवाजे साधे चौकोनी आहेत. यामध्ये साध्या पद्धतीची बांधणी आहे. पण ही लेणी आता भग्न अवस्थेत आहेत. रायगड गॅजेटमध्ये या समुहांशिवाय महाडच्या ईशान्येस काही खोल्या व पाण्याचे टाके असलेला एक तिसरा समुहही आहे. तसेच नागोठण्याकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील टेकडीच्या दक्षिण बाजूस एक खोली कोरलेली आहे. या दोन्ही ठिकाणापर्यंत सध्याचे अभ्यासक, लेणी संवर्धक पोहचले आहेत की नाही हे माहीत नाही. पण आम्ही याचा शोध घेण्याचा प्रयत्न नक्कीच करणार आहोत.

(आम्ही या लेणीवर दि. 10 मे 2025 रोजी गेलो होतो. त्यावेळी सोबत सारीष डोळस, ॲड खंडेश बगाटे वसुरेश माने हे होते.) ■ ■



प्रफुल्ल पुरळकर
मो. 9930214308



# सफर लेणींची, ओळख इतिहासाची
# नागनाथ - गंभीरनाथ लेणी

खोपोलीजवळ मुंबई पुणे रेल्वेच्या ठाकुरवाडी या लहानशा स्टेशनपासुन जवळच ‘नागनाथ देवस्थान’ आहे ज्याला स्थानिक लोक नाथबाबा म्हणून ओळखतात. हे ठिकाण नागनाथ लेणी, गोरक्षनाथ लेणी किंवा गंभीरनाथ लेणी अशा बऱ्याच नावांनी ओळखले जाते. ईकडे जाण्यासाठी बऱ्याच वाटा आहेत. म्हणजे ठाकुरवाडी स्टेशनकडे ऊतरून ट्रॅकवरून चालत या ठिकाणी पोचता येते. बीड खुर्द लेणीकडून एक कच्चा गाडी रस्ता तसाच पुढे ठाकुरवाडी या आदिवासी वस्तीकडे जातो. हा रस्ता काही ठिकाणी फारच खराब असुन पुर्णतः धुळीने भरलेला असुन ट्रॅक्टरच्या वाहतुकीमुळे मोठेमोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे ईथे साधी कार नेणे म्हणजे जंगलात अडकून पडणे ठरु शकते. ऑफरोडींगचे सुलेमानी किडे असणाऱ्या आमच्यासारख्या ठार वेड्या भटक्यांसाठी मात्र जंगलातले असे अतिकठीण रस्ते म्हणजे एक पर्वणीच असते. आम्ही याच कच्च्या रस्त्याने ठाकुरवाडीकडे निघालो आणि हा extreme off-roading वाला पॅच पाहुन ईथे गाडी टाकावी की नाही याचा काही वेळ विचार करून ‘जो होगा देखा जायेगा’ या पोळसाहेबांच्या दिलाशाने गाडी त्या अतिखराब रस्त्याने पुढे घेतली. पण तरीही पुर्ण ट्रेक करून परत येताना याच पॅचवर येईपर्यंत मात्र या ऑफ रोड पॅचमध्ये गाडी कशी चढवावी हा विचार मात्र घोळतच होता. परत येताना या धुळीने आणि मोठमोठ्या खड्ड्यांनी भरलेल्या त्या रस्त्यात Compact SUV असलेली कार पण चढेनाशी झाली. त्यामुळे अंतिम ऊपाय म्हणून सर्व खड्ड्यांमध्ये दगड टाकून मोठ्या शिताफीने गाडी त्या पॅचमध्ये चढवुन आपणाकडे Mahindra Thar नसल्याची कमतरता भासु दिली नाही. ठाकुरवाडी वस्तीतुन एक वाट रेल्वे ट्रॅककडे जाते आणि रेल्वेचे दोन बोगदे पार केल्यावर ऊजवीकडे ‘नागनाथ देवस्थान’ असा पिवळ्या रंगाचा बोर्ड दिसतो आणि या वाटेने 10/15 मिनीटे चढुन गेल्यावर एक नैसर्गिक गुहा लागते. या गुहेत टोळ बसलेले असतात. त्यामुळे आत जाता येत नाही आणि ईथुन पुढे कातळात खोदलेल्या पायऱ्या चढून आपण नागनाथ / गंभीरनाथ गुहांकडे पोचतो. ईथे सुरुवातीलाच एक पाण्याचे टाक दिसते. पण यातले पाणी फारच खराब असुन ते पिण्यायोग्य नाहीय. त्यापुढे मुख्य लेणी आहेत. या परीसरातल्या ईतर लेणींप्रमाणेच ही सुद्धा एक नैसर्गिक गुहा असुन आतमध्ये प्रवेश केल्यानंतर डावीकडे एक पाण्याचे भुयारी टाके असुन यातले पाणी पिण्यासाठी वापरले जाते, तर ऊजवीकडे भिक्खुकक्ष आढळतो. यात दगडात कोरलेली भिक्खुंची झोपण्याची जागा आहे. लेणीच्या मुख्य भागात मात्र ईथे वास्तव्य करणाऱ्या साधुने अख्खा संसार मांडुन पुर्ण गुहेचे विद्रुपीकरण करून टाकलेले आहे. या गुहेत दगडाच्या भिंतींचे पार्टीशन करून तीन भाग पाडलेले आहेत आणि आतल्या भागात जाण्यासाठी केलेला दरवाजा हा अगदीच लहान असल्यामुळे थोडा हट्टाकट्टा माणूस त्यातून आत जाऊ शकणार नाही.नागनाथ लेणींचा ऐतिहासिक दृष्ट्या सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. दगडात कोरलेल्या पायऱ्या, भुयारी टाके, शरभाचे शिल्प या गोष्टी हा डोंगराचा सुळका हा सातवाहनकालीन टेहळणीचा किल्ला होता असेल अशी खात्री वाटते, लेणीच्या आतील भागात ऊजवीकडे असलेला भिक्खुकक्ष पाहुन आणि या परीसरात असलेल्या बौद्ध लेणींच्या शृंखलांचा अभ्यास करता ही लेणी बौद्ध लेणी होती याबद्दल दुमत नाहीय. पण यावर अभ्यासकांनी सखोल अभ्यास केल्यास यातून खरा इतिहास उजेडात येईल. कारण नंतरच्या काळात नाथ संप्रदायांनी यावर कोणत्या कालखंडात कब्जा केलेला असेल याबद्दलही संदर्भ शोधता येऊ शकतात. आता तर एका अमराठी बाबाने तिथे आपला संसार मांडुन त्या लेणीची पार दुरावस्था करून टाकलेली आहे. पुरातत्व खात्याने या लेणींचा सखोल अभ्यास करवून यावरचे हे अतिक्रमण हटवून या लेणींना मोकळा श्वास देण्याची आणि या ऐतिहासिक जागेचा खरा इतिहास प्रकाशात आणण्याची नितांत गरज आहे. माझ्या ट्रॅव्हल डायरीतून. ■ ■

- प्रशांत कदम




## महासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आनंदनगर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आनंदनगर बर्डी येथील आहे. 14 ऑक्टोबर 1956 च्या बौद्ध धर्मांतर काळात आनंद नगर हे आंबेडकरी चळवळीतील मुख्य केंद्र होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथे अनेक बैठका झाल्या होत्या. श्याम हॉटेल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर थांबले होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक चळवळ उभी करण्यात आनंद नगर आघाडीवर होते. सुप्रसिद्ध मराठी साप्ताहिक जयभीम येथून प्रकाशित झाले आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन करण्यात ही वस्ती सर्वांत पुढे होती.

संवाद कपिल नारनवरे
मो. 9370773608

### आमदार संजय देरकर यांच्या तारांकित प्रश्नाला शासनाचे उत्तर

# महाराष्ट्रात बालमृत्यू आणि कुपोषणावर नियंत्रण





**नागपूर :** महाराष्ट्राने बालमृत्यू आणि कुपोषणावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवले असून नवजात मृत्यूदर संयुक्त राष्ट्राच्या 2030 च्या लक्ष्यापेक्षा कमी झाला आहे असा सकारात्मक अहवाल राज्य सरकारने विधिमंडळात सादर केला. यवतमाळ जिल्ह्यातील वणी मतदारसंघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार संजय देरकर यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती देण्यात आली. सरकारने दिलेल्या माहितीनुसार 2023 मध्ये राज्याचा नवजात मृत्यूदर प्रति हजार जन्मांमागे केवळ 11 झाला असून संयुक्त राष्ट्राने ठरवलेले 12 पेक्षा कमी असे लक्ष्य महाराष्ट्राने पाच वर्ष आधीच गाठले आहे. पालघरसह आदिवासी भागातही तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण अवघे 0.23 टक्के तर मध्यम कुपोषित बालके 1.98 टक्के इतकीच राहिली आहेत. साथीच्या आजारांवरही सरकारने प्रभावी नियंत्रण मिळवले असून गेल्या वर्षाच्या तुलनेत डेंग्यू स्वाईन फ्लू अतिसार यांसारख्या आजारांमुळे होणारे मृत्यू लक्षणीयरीत्या कमी झाले आहेत. मलेरियाचे 20 मृत्यू झाले त्यापैकी 14 गडचिरोलीत नोंदवले गेले तरी राज्यातील बहुतांश जिल्ह्यांचा वार्षिक परजीवी निर्देशांक एकच्या खाली आहे. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना पोषण पुनर्वसन केंद्रे सुवर्णमयी 1000 दिवस अभियान मातृवंदना योजना तसेच डासोत्पत्ती नियंत्रणासाठी गप्पी मासे सोडणे कोरडा दिवस आदी उपाययोजनांमुळे हे यश मिळाल्याचे सरकारने सांगितले. आमदार संजय देरकर यांच्या प्रश्नामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणेची चांगली कामगिरी विधिमंडळासमोर आली असून कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यात महाराष्ट्र देशात आघाडीवर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# डिग्रीधारक ऐवजी स्किलधारक बना : कर्नल राजू पाटील

**नागपूर :** नोकरीचा काळ संपला आहे, पदवीला महत्व राहिले नाही. अनेक पीएचडीधारक घरात बसून आहेत. गुगल, मेटा सारख्या कंपनीत नोकऱ्या आहेत. पण डिग्री ऐवजी स्किल धारकांची गरज आहे. विहारात अभ्यासिका आहेत. पण योग्य मार्गदर्शनाअभावी ते बेरोजगार आहेत. UPSC/MPSC शिवाय नोकऱ्यांचे अनेक मार्ग आहेत. जवाहर नवोदय विद्यालयात, राज्य सरकारच्या सैनिक शाळेत विनामूल्य शिक्षण आहे. डिफेंस, मर्चेंट नेव्हीमध्ये लाखो नोकऱ्या आहेत. जगातील पाच देशात विनामूल्य शिक्षण दिले जाते, त्याकडे लक्ष दिले पाहिजे. संधीचा शोध घेऊन विदेशी शिक्षण व नोक 'यासाठी मुलांना प्रेरित केले पाहिजे. काळानुसार बदलून आपण व्यवसाय उद्योगाकडे वळलो पाहिजे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाने संस्था उभ्या केल्या पाहिजे. आपण 'Each one Teach one' धोरणातून मुलांना तयार केले पाहिजे. माहिती अभावी जीवनातील अनेक संधी दुरावल्या जातात, असे धम्मसंगोष्टीच्या 362 व्या सभेचे व्याख्याते कर्नल राजू पाटील यांनी 'नव शिक्षणाच्या दिशा' या विषयावर बोलतांना विचार व्यक्त केले.



मागील आठ वर्षापासून प्रत्येक गुरुवारी समाज प्रबोधनात्मक कार्य धम्मसंगोष्टीच्या माध्यमातून होत आहे. आम्हाला माणूस म्हणून घडविणाऱ्या प्रत्येक महामानवांचे स्मरण करणे गरजेचे असते. म्हणून वर्षाच्या शेवटी 25 डिसेंबर 1927 रोजी केलेले मनुस्मृती दहन, 20 डिसेंबर 1956 रोजी संत गाडगे महाराजांचा मृत्यू, तसाच वर्षाच्या प्रारंभी 1 जानेवारी 1818 भीमा कोरेगावचा संग्राम, 3 जानेवारी 1831 रोजी सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन, 5 जानेवारी 1905 रोजी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांचा वाढदिवस, 6 जानेवारी 1904 रोजी जन्मलेले जयभीमचे जनक बाबू हरदास एल. एन. या सर्व ऐतिहासिक व प्रेरणादायी घटनांचा श्रीराम बनसोड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संक्षिप्त आढावा घेतला. सभेची सुरुवात जमूना डगावकर यांच्या 'भीमा तुझ्या महूला जाऊन काल आलो' या भीमगीताने झाली. संचालन नरेश धोपटे यांनी तर आभार रोहिणी मेश्राम यांनी व्यक्त केले. सभेला गणमान्य लोकांचा उत्फूर्त प्रतिसाद लाभला. धम्मपालन गाथाने सभेची सांगता झाली.

# अक्षरोदय साहित्य मंडळाचे 14 डिसेंबरला कविसंमेलन

**नागपूर :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'अक्षरोदय साहित्य मंडळ, महाराष्ट्र राज्य' या प्रतिष्ठित साहित्य संस्थेतर्फे 14 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजता माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार, सहयोग नगर, नांदेड येथे कविसंमेलनाचे आयोजन केले आहे. कविसंमेलनाचे अध्यक्षस्थानी चंद्रकांत चव्हाण हे राहणार असून, प्रमुख पाहुणे डॉ. भीमराव हटकर, अनुरत्न वाघमारे आणि प्रमुख पाहुण्या जया सूर्यवंशी हे उपस्थित राहणार आहेत. साहित्य, समाजकारण आणि बौद्ध संस्कृती यामध्ये योगदान देणाऱ्या या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या कविसंमेलनात राज्यभरातील विख्यात, लोकप्रिय आणि उदयोन्मुख कवी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. त्यात प्रमुख पंडित पाटील बेरळीकर, प्रज्ञाधर ढवळे, नागोराव डोंगरे, रुपाली वाघरे, अशोक कुबडे, दत्ता वंजे, शिवाजी होळकर, जाफर आदमपूरकर, थोरात बंधू, आ. ग. ढवळे, महेंद्र भगत, निवृत्ती लोणे, शैलेश कवठेकर, चंद्रकांत कदम, दिगंबर कानोले, गजानन हिंगमिरे, अंजली मुनेश्वर, रुचिरा बेटकर, सुमेध घुगरे, बाबुराव पाईकराव, साईनाथ रहाटकर, संजय भगत, कोंडदेव हटकर, अशोक मगरे, वंदना मघाडे, उज्जेनकुमार पाईकराव, सुजाता पोपुलवार, शीला कोकाटे, चांगुणा गोणारकर, सरस्वती गोणारकर, गया कोकरे, लता शिंदे, मनिषा सपकाळे. या सर्व कवींच्या उपस्थितीमुळे कविसंमेलनात विविधता, साहित्यिकता, सामाजिक भान आणि भावनिक उंचीचा संगम पाहायला मिळणार आहे. कार्यक्रमाचे आयोजक सिंधु दहिफळे, नरेंद्र धोंगडे, उषा ठाकूर, सदानंद सपकाळे, बालिका बरगळ, माया तळणकर, सुनंदा भगत, पंकज कांबळे, आविष्कार शिंदे, सुजित भगत, अजित मुनेश्वर, धम्मा सरोदे आहे.



## डॉ. आबेडकर कॉलेज दीक्षाभूमीच्या विद्यार्थ्यांचा हिवाळी अधिवेशन अभ्यासदौरा

**नागपूर :** विद्यार्थ्यांना लोकशाहीची कार्यप्रणाली, विधानमंडळाचे कामकाज तसेच प्रत्यक्षात विधिमंडळाचे वातावरण अनुभवता यावे या उद्देशाने नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनास शैक्षणिक भेट दिली. या भेटीचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जागरूकता, संसदीय कार्याचे ज्ञान आणि लोकशाही संस्थांचा प्रत्यक्ष अनुभव निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांना विधानसभेचे व विधानपरिषदेचे कामकाज पाहण्याची संधी मिळाली. अधिवेशनादरम्यान मंत्री व विरोधी पक्षातील सदस्य यांच्यातील चर्चा, प्रश्नोत्तरे आणि विविध विषयांवरील मांडणी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहिली. विद्यार्थ्यांनी प्रथमच विधिमंडळाचे औपचारिक वातावरण, शिस्त आणि प्रक्रियांचे पालन प्रत्यक्ष पाहिले. लोकप्रतिनिधी जनहिताच्या प्रश्नांवर चर्चा कशी करतात, निर्णय कसे घेतले जातात हे पाहून विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीबद्दल अधिक आदर निर्माण झाला. डॉ. विद्या चौरपगार व रवींद्र तिरपुडे यांनी हिवाळी अधिवेशन भेटीचे आयोजन केले. प्राचार्या डॉ. दीपा पान्हेकर यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

# अथर्व सिद्धार्थ गायकवाड स्मृती बालधम्म संस्कार शिबिर



**नागपूर :** समाज कल्याण विभागाचे उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड (बोधी) यांचे अपत्य अथर्व सिद्धार्थ गायकवाड(बोधी) यांचे दीर्घ आजारानंतर दि. 11 डिसेंबर 2025 रोजी दुःखद निधन झाले. अथर्वच्या स्मृतीस अभिवादन करून शोकसभेत बीडीएसपी संघाच्या वतीने दि. 25 डिसेंबरला 'निलफार्म रिसोर्ट' येथे बालधम्म संस्कार शिबिर अथर्वच्या स्मृती प्रित्यार्थ आयोजित करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. परंपरेला फाटा देत आपल्या मुलाच्या स्मृती इतर मुलांच्या संस्कारातून जागृत ठेवण्याच्या या उपक्रमाला अथर्वच्या आई वडील डॉ. सिद्धार्थ गायकवाड आणि रोशनी गायकवाड यांनी संकल्प केला आहे. ना कोणत्या कर्मकांडांना ना कोणत्या सोपस्काराला महत्त्व देत अथर्व सिद्धार्थ गायकवाड (बोधी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बाल धम्म संस्कार शिबिर बीडीएसपी संघ आयोजित केले. अथर्व सिद्धार्थ गायकवाड (बोधी) जो फक्त 13 वर्षाचा होता. तो अपुर्ण जीवनच जगला, त्यामुळे त्याचे जीवन पुर्ण करण्यासाठी बीडीएसपी संघाने दि. 25 डिसेंबर 2025 ला बाल धम्म संस्कार शिबिर आयोजित केले.

तो बुद्धिमान होता. तो समजदार होता. इतर मुले सुद्धा सुसंस्कारित घडावे म्हणून हे विशेष शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात मुलांना प्रत्यक्ष जीवनाचे धडे दिले जाणार आहे. बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीतील आदर्श समाज निर्माण करण्याच्या दिशेने उचललेले बीडीएसपी संघाचे हे प्रथम पाऊल आहे. हे शीबीर फक्त बीडीएसपी संघाच्या, 'धम्म आपल्या घरी' या उपक्रमातील मुलांसाठी आयोजित केल्या गेले आहे.

## महत्वाचे

### पवनी न्यायालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली



**पवनी :** विश्वरत्न, परमपूज्य, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पवनी न्यायालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी पवनी न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश अ. वि. पंडित व सह न्यायाधीश फरकुंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच सर्व वकील व कर्मचाऱ्यांनी देखील पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी जेष्ठ विधीज्ञ ॲड. महेंद्र गोस्वामी, ॲड. खेमराज जिभकाटे, ॲड. कावेरी शेंडे, ॲड. दिपक देशमुख, ॲड. विवेक देशमुख, ॲड. बावने, ॲड. वनारसे, ॲड. गजभिये, ॲड. पारधी, ॲड. सुखदेवे, ॲड. तुळसकर, ॲड. भुरे, सरकारी अभियोक्ता व न्यायालयातील संपूर्ण कर्मचारी, कारकून व पक्षकार उपस्थित होते. याप्रसंगी न्यायाधीश पंडित व न्यायाधीश फरकुंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व आदरांजली वाहिली. या कायक्रमाचे संचालन, प्रास्ताविक व आभारप्रदर्शन जेष्ठ वकील ॲड. महेंद्र गोस्वामी यांनी केले.

### काष्ट्राईब महासंघांचे भव्य धरणे व निदर्शने




**नागपूर :** महाराष्ट्र राज्य काष्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, कास्ट्राईब अंगणवाडी सेविका मदतनीस संघटनाद्वारा हिवाळी अधिवेशन निमित्त अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रश्नाबाबत तसेच शासनाच्या मागासवर्गीय धोरणविरोधात यशवंत स्टेडियम नागपूर, येथे भव्य धरणे व निदर्शने आंदोलन अरुण गाडे, अध्यक्ष काष्ट्राइब महासंघ यांचे नेतृत्वात आणि गजानन थुल महासचिव, यशवंत माटे संघटक सचिव, श्यामराव हाडके, अजय निकोसे, विधी सल्लागार, विशाखा काळबांडे, काष्ट्राईब अंगणवाडी सेविका कर्मचारी संघटना यांचे प्रमुख उपस्थितीत झाले. विविध मागण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन संपन्न झाले आयोजित असून सामाजिक न्याय मंत्री व पंकज भाऊ भोयर शालेय शिक्षण व गृहमंत्री महाराष्ट्र राज्य आंदोलन स्थळी भेट दिली व मागण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे म्हटले. अंदोलन यशस्वी करण्यासाठी रवी पोथारे, सिताराम राठोड, विनोद बनसोड, लता पाटील, उमाकांत शेंडे, कल्पना खोब्रागडे, रंजना झाडे, दर्शना वाघमारे यांनी सहकार्य केले.

# नागपूर येथे आज डॉ. बाबा आढाव अभिवादन सभा



**नागपूर :** ज्येष्ठ सत्यशोधक, सत्याग्रही, समाजवादी, कष्टकऱ्यांचे आधारवड, सच्चा समता योद्धा डॉ. बाबा आढाव यांचे दि. 8 डिसेंबर 2025 ला 95 व्या वर्षी निधन झाले.

सत्यशोधकी विश्वात त्यांच्या निधनाने पोकळी निर्माण झाली. सर्वत्र शोककळा पसरली. सामाजिक चळवळींचा आधारवड कोसळला. पुरोगामी चळवळी पोरक्या झाल्या. बाबांना मानणारा जनसमुदाय महाराष्ट्रभर आहे. डॉ. बाबा आढाव यांनी आयुष्यभर उपेक्षित, शोषित स्त्री-शुद्रातिशुद्र, अल्पसंख्यांक कष्टकरी शेतकरी समुहाच्या न्यायासाठीच्या संघर्षाला वाहून घेतले. 'एक गाव एक पाणवठा' या कार्यक्रमाच्या प्रबोधनासाठी बाबा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरले. त्यातूनच समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व ही संविधानिक मानवी मूल्ये लोकांमध्ये रुजविण्याचे काम बाबांनी केले. अशा समाजशिल लढवय्या सत्यशोधकाला अभिवादन करण्यासाठी दि. 13 डिसेंबर 02025, शनिवारला, दुपारी 4 वाजता, सेवादल महिला महाविद्यालय, सक्करदरा चौक, उमरेड रोड, नागपूर, येथे अभिवादन सभेचे आयोजन केलेले आहे. सर्व सत्यशोधकी, पुरोगामी, जनवादी विचाराच्या संघटना, कार्यकर्त्यांनी तसेच समस्त नागरिकांनी अभिवादन सभेला वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन, सत्यशोधक डॉ. बाबा आढाव अभिवादन समिती, नागपूरच्या वतीने करण्यात येत आहे.

# पॅंथर ॲड. सुरेशचंद्र घाटे प्रभाग १७ मधुन निवडणूक लढविणार



**नागपूर :** गेल्या अनेक वर्षापासुन आंबेडकरी चळवळीत सक्रीय असलेले नामांतर योद्धा व लॉंग मार्च नेता पॅंथर ॲड. सुरेश घाटे हे आंबेडकरी समाजाचे प्रभुत्व असलेल्या प्रभाग 17 मधुन नागपूरात महानगरपालिकेची निवडणूक लढणार असल्याचे एका प्रसिध्द पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. पत्रकात ते म्हणाले की त्यांना सामाजिक राजकीय आथिक व शैक्षणिक क्षेत्रांचा दांडगा अनुभव आहे. झोपडपट्टी वासीयांना मालकी पटटे मिळण्यापासुन ते रेल्वे लगत लागुन असलेल्या झोपडपटटयांना वाचविण्याचे काम सन 1967 76- व सन 2015 -16 ला केले. ॲड. सुरेश घाटे वयाच्या 80 वया वर्षीही धडाडीने समाजाच्या सर्वकष विकासराकरीता काम करीत आहेत. आंबेडकरी समाजाची राजकीय शक्ती नगण्य झाली आहे. त्यामुळे समाज सामाजिक राजकीय आर्थिक शैक्षणिक समस्यांनी ग्रस्त आहे. समाजात नावाजलेले असलेला एकमेव नेवा ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकरण डोक्या पलिकडचे आहे. समाजातील निवृत्त ज्येष्ठांची उदासिनता सिक्रन हाईस व तरूणांची स्मार्टफोनच्या अतिरेकी व्यसनामुळे आंबेडकरी चळवळ व विचारधारेच्या संविधान व लोकशाही ला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ॲड. घाटे सर निवडणुकीत उभे राहण्यास सज्ज झाले आहेत. धनदांडयांच्या पैशाच्या उधळण्या मध्ये नगाऱ्यात तुतारी वाजविता येणार नाही. या करिता आंबेडकरी कार्यकत्यांना एकाच प्रभागात एकाच वर्गाकरीता एकाच प्रबल उमेदवारांच्या पाठिमागे ताकत लावल्यास 25 ते 30 नगरसेवक समविचारी पक्षानी आघाडी करून निवडुन आणु शकतो असा विश्वास ॲड. घाटे यांनी व्यक्त केला.

# भाऊसाहेब, आम्हाला माफ करा ! शासन आता तरी जागे व्हा !

## आज उपोषण




**नागपूर :** ॲग्रो - व्हॅट ॲग्रो इंजि. मित्र परिवार तर्फे हा आपणास विनंती आहे की येत्या शनिवारी दि. 13/12/25 रोजी, डॉ. पंजाबराव देशमुख स्मारक जवळ, कृषी महाविद्यालय, नागपूर समोर आमचा परिवार व शहरातील अनेक सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, एका दिवसाच्या लाक्षणिक उपोषणाला शनिवारी सकाळी 11 वाजता बसतील असे प्रणय श्रावण परात सचिव - ॲग्रो - व्हॅट ॲग्रो इंजि. मित्र परिवार यांनी सांगितले आहे. संघटनेचे सचिव प्रणय श्रावण परात यांनी सांगितले की, भाऊसाहेब देशमुख यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त शासनाकडे केलेल्या मागण्यांवर अद्याप कार्यवाही न झाल्याने हा आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्य मागण्या, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात भाऊसाहेबांवरील विषय समाविष्ट करणे, जयंती/पुण्यतिथीला प्रत्येक विधानसभा क्षेत्रात कृषी चर्चासत्रे, सर्व तालुक्यांत स्वतंत्र कृषी भवन उभारून त्यांना भाऊसाहेबांचे नाव देणे, राष्ट्रीय कृषी विज्ञान कॉंग्रेस दरवर्षी आयोजित करणे, कृषक हितासाठी कृषी पदवीधर आमदार/खासदार संकल्पना लागू करणे. नागपूरकरांनी या उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# प्रबोधनाने मानसिक गुलामी विरुध्द जागृती येईल : नरेंद्र पाटील

**पांढुर्णा :** मानसिक गुलामी विरुद्ध प्रबोधन चळवळ सतत आणि सार्वत्रिक गतिमान करण्यासाठी प्रयत्न करावे लागेल. कारण प्रबोधनाने मानसिक गुलामी विरुद्ध लोक जागृती येते, असे विचार संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. ते पांढुर्णा येथे प्रबोधन सभेत अतिथी म्हणून बोलत होते. संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे वतीने अशोक सरस्वती यांचे नेतृत्वात दि. 28 नोव्हेंबर ते 25 डिसेंबर, 2025 पर्यंत प्रबोधन यात्रा आयोजित करण्यात आली आहे. त्या अंतर्गत पांढुर्णा येथील आंबेडकर वार्डात प्रबोधन सभा संपन्न झाली. प्रबोधन यात्रेचे मार्गदर्शक अशोक सरस्वती यांनी 'मानसिक गुलामी - सर्व गुलामीची जननी' या विषयावर व्याख्यान दिले. त्यावेळी ते म्हणाले की, 'भारतीय संविधान हटवून मनुस्मृती आधारित हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी नवे संविधान आणायची घाई राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला झाली आहे. समाजात असलेल्या मानसिक गुलामीमुळे त्यांचे कट कारस्थान यशस्वी होताना दिसत आहे. म्हणून विवेकी, लोकशाही मानणाऱ्या राष्ट्रवादी लोकांनी प्रबोधनाची प्रक्रिया राबवून संघाचे कट कारस्थान उधळून लावले पाहिजे असे त्यांनी आव्हान केले. 25 डिसेंबर रोजी जरुड मानसिक गुलामी विरुद्ध प्रबोधन आयोजित करून प्रबोधन यात्रा समारोप होणार आहे. यात्रेतील ही 13 प्रबोधन सभा होती. याप्रसंगी माणिक वानखेडे यांनी विचार मांडले. भाऊराव सोमकुवर सभेचे अध्यक्ष होते. संचालन महेंद्र वहाने यांनी केले. मिलिंद नारनवरे यांनी आभार प्रदर्शन केले.



# रिपब्लिकन फेडरेशन



**नागपूर :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रिपब्लिकन फेडरेशन तर्फे संविधान चौक नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला प्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. जॉ ड्रेझ, (रांची, झारखंड)आणि प्रसिद्ध साइंटिस्ट डॉ. स्मिता पखाले (कॅनडा) हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. यावेळी रिपब्लिकन फेडरेशन मुख्य संयोजक मिलिंद पखाले, नरेश वाहाणे, भारती सहारे, वर्षा सहारे, सुधीर मेश्राम, बंटी उके, मनोज शेंडे, अलका चौकीकर, मृणालिनी दहीवडे, नरेंद्र धनविजय, राजेश गोडघाटे आणि इतर रिपब्लिकन फेडरेशन कार्यकर्ते उपस्थित होते.

बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

**प्रवीण गायकवाड**
09850301528
विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी

**निलेश कांबळे**
मो. 94236 34976
एरिया : उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर

**सुनील कुंभारे**
मो. 98238 94329

**विशाखा नारायणे**
मो. 99602 41648
एरिया : जोगी नगर , काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी

**प्रमोद चहांदे**
मो. 9273170800
जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,

**चंदू नगरारे**
मो. 9975968852
शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.

**निलेश वालदे**
मो.9764772886
मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर

**मसारकर**
मो. 918080158604
धाडीवाल ले आउट.

**लिना विनोद भोवते**
मो.9021770694
इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.

**प्रविण राजाराम ठवरे**
मो. 9372331798
मॉडेल टॉऊन, बेझनबाग.

**रितेश अनिल बोदेले**
मो. 9511843694
WCL पॉव ग्रीड

**गगन प्रताप नाहारकर**
मो. 8793389936
मेकोसाबाग, नवा नकाशा.

**प्रमोद बागडे**
मो. 9764973627
इंदोरा, सुगत नगर.

**बी प्रकाश राव**
मो. 9022621075
भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.

**पुष्पीत कराडे**
मो. 8055416108
वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.

**राहुल राजकुमार जांबुळकर**
मो. 9673392025, नारी.

**श्रीकांत वासनिक**
मो. 9767624345
काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.

**मंगेश शंभरकर**
मो. 9970258703
नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.

**निळकंठ वि. जवादे**
मो. 9623773365
रमा नगर, मनीष नगर.

**विनोद कृष्णराव डूले**
वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, .
मो. 7447767922

**आशिष थुल**
मो. 9423400956
धरमपेठ, आंबेडकरनगर

**राम मानवटकर**
मो. 8626037360,
न्यू. मनिष नगर

**अमन शरणागत**
मो.9575673895
टेकअप सिटी , दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,

**राहुल आठवले**
मो.8485854398
संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर

**दिगाबर पांडुरंग वासनिक**
मो.9561974131
454- नविन सुभेदार ले आऊट
दिनेश पेपर एजन्सी

**गौतम भीमराव मेश्राम**
जयवंत नगर , अभयनगर
मो. 9975941830

**स्वप्निल वाढबुधे**
न्यू अमर नगर, शेषनगर, विठ्ठल नगर, सिद्धेश्वरी नगर, चक्रपाणी नगर, गजानन नगर. मो. 96046 54382

**योगेश मेहर**
टेक ऑफ सिटी, बहादुरा परिसर
मो. 919552971648

**दिनेश टेंभुर्णे**
इंदोरा, लष्करी बाग, बेझनबाग, पी. डब्ल्यू एस. कॉलेज परिसर
मो. 8806511702

**गजानन गायकवाड**
कार्तिक मार्टइ , बेसा सेंटर, पेट्रोल पंप जवळ, बेसा
मो.9921552488

**राजेश नंदनवार**
राहुलनगर, सोमलवाडा
मो. 9850335018

**विनायक हाडके**
प्रतापनगर
मो.न.9545750757

**शैलेश माटे**
जयताळा, त्रिमूर्ती नगर, अंबाझरी मो. 9767987363

**संदिप टेंभुरकर**
समता नगर, नारा रोड नागपूर
मो. 8657565247

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648